

नाशिक : प्रज्ञा चहारे या विद्यार्थिनाला ॲमेझॉनमध्ये इंटर्नशिप मिळाल्याबद्दल सत्कार करताना प्राचार्य डॉ. एन. एस. पाचपोर.

# के. के. वाघची विद्यार्थिनी प्रज्ञा चहारेला ॲमेझॉनमध्ये इंटर्नशिप

**नाशिक :** के. के. वाघ कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयातील बी. टेक (जैवतंत्रज्ञान) अंतिम वर्षात शिकणारी विद्यार्थिनी प्रज्ञा सुरेश चहारे हिची ॲमेझॉन या बहुराष्ट्रीय कंपनीत इंटर्नशिपसाठी निवड झाली आहे. याबद्दल संस्थेच्या वतीने प्राचार्य डॉ. एन. एस. पाचपोर यांनी तिचा सत्कार केला. ॲमेझॉन कंपनीच्या मुंबई मुख्यालयात ऑपरेशन्स लीड इंटर्न या पदावर इंटर्नशिप मिळाली आहे. या कालावधीत तिला दरमहा ६० हजार रुपये मानधन मिळणार आहे. ऑनलाइन लेखी व मुलाखत या दोन टप्प्यांत निवड प्रक्रिया पार पडली. इंटर्नशिपनंतर तिला नोकरीची संधी उपलब्ध होणार आहे. संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, सचिव प्रा. के. एस. बंदी, जनसंपर्क संचालक अजिंक्य वाघ, डॉ. व्ही. एम. सेवलीकर यांनी प्रज्ञाचे अभिनंदन केले.

पुढारी Nashik Edition
Mar 21, 2026 Page No. 02
Powered by: erelego.com